भूकंपग्रस्तांच्या पुनर्वसनाकरिता संपादित जमिनीचा मा.दिवाणी न्यायालयाने दिलेल्या निर्णयानुसार भुसंपादन अधिनियम १८९४ च्या कलम १८ नुसार वाढीव मोबदला अदा करण्यास्तव निधी उपलब्ध करुन देण्याबाबत...

महाराष्ट्र शासन
मदत व पुनर्वसन विभाग
शासन निर्णय क्रमांकः पुनर्व- २०२६/प्र.क्र.३८/पुनर्वसन-६
मादाम कामा मार्ग, हुतात्मा राजगुरु चौक,
मंत्रालय, मुंबई- ४०००३२.
दिनांक: ३१ ऑगस्ट, २०२६

वाचा -

१) महसूल व वन विभाग शासन निर्णय क्र. अ.क.वा./न्यायप्रकरण/१०९९/प्र.क्र.१५२/अ-२, दि. २४/१२/२००३.
२) महसूल व वन विभाग शासन परिपत्रक क्र. बीयुडी-२०१८/प्र.क्र.६७/ब-१,दि. ९/३/२०१८.
३) सह आयुक्त (पुनर्वसन), विभागीय आयुक्त कार्यालय, छत्रपती संभाजीनगर यांचे पत्र जा.क्र.२०२५/पुनर्वसन/कावि-१७६, दि.२०/०२/२०२५

प्रस्तावना -

धाराशिव (उस्मानाबाद) जिल्ह्यातील उमरगा तालुक्यातील भूकंपग्रस्तांच्या पुनर्वसनाकरिता संपादित जमिनीच्या भूसंदर्भ क्र. २४२/२००८ प्रकरणी भूसंपादन अधिनियम, १८९४ च्या कलम १८ अन्वये वाढीव मोबदला अदा करण्यासाठी सह आयुक्त (पुनर्वसन), विभागीय आयुक्त कार्यालय, छत्रपती संभाजीनगर यांनी निधी उपलब्ध करुन देण्याची विनंती संदर्भाधीन क्र.३, दि. २०/०२/२०२५ येथील पत्रान्वये केली आहे. सदर विनंतीच्या अनुषंगाने निधी वितरीत करण्याची बाब शासनाच्या विचाराधीन होती.

शासन निर्णय-

धाराशिव (उस्मानाबाद) जिल्ह्यातील उमरगा तालुक्यातील भूकंपग्रस्तांच्या पुनर्वसनाकरिता संपादित जमिनीच्या पुढील तक्त्यात नमूद प्रकरणात भूसंपादन अधिनियम, १८९४ च्या कलम १८ अन्वये वाढीव मोबदला अदा करण्याकरिता सह आयुक्त (पुनर्वसन), छत्रपती संभाजीनगर यांनी मागणी केलेली रक्कम रूपये १५,१९,१७१/- (रूपये पंधरा लक्ष एकोणीस हजार एकशे एक्काहत्तर फक्त) एवढा निधी वितरीत करण्यास शासन मान्यता देण्यात येत आहे.

अ.क्र.	एलएआर क्रमांक	नांव व पत्ता	वितरीत निधी
१	क्र.२४२/२००८	श्री.लालशा नुरशहा फकीर रा. नारंगवाडी ता. उमरगा, जि.धाराशिव	रु.१५,१९,१७१/-
		एकूण	रु.१५,१९,१७१/-

२. धाराशिव (उस्मानाबाद) जिल्ह्यातील भूकंपग्रस्तांच्या पुनर्वसनाकरिता संपादित जमिनीच्या उक्त तक्त्यात नमूद प्रकरणात भूसंपादन अधिनियम, १८९४ च्या कलम १८ अन्वये घोषित निवाड्यानुसार वाढीव मोबदला अदा करण्यासाठी सन २०२६-२०२७ या वित्तीय वर्षात BEAMS प्रणालीवर उपलब्ध तरतूदीतून रूपये १५,१९,१७१/- (रूपये पंधरा लक्ष एकोणीस हजार एकशे एक्काहत्तर फक्त) एवढा निधी "मागणी क्रमांक सी-०९, मुख्य लेखाशीर्ष ४२३५-सामाजिक सुरक्षा व कल्याण यावरील भांडवली खर्च, ०१ पुनर्वसन, २०१ इतर पुनर्वसन योजना, (००) (००) (०१) इतर पुनर्वसन योजना (अनिवार्य) (४२३५ ०१०८) ५०-इतर खर्च (भारित)" या लेखाशीर्षाखाली विभागीय आयुक्त, छत्रपती संभाजीनगर यांना खालील अटींच्या अधीन राहून उपलब्ध करुन देण्यात येत आहे.

वित्तीय शिस्तीच्या अनुषंगाने सर्व संबंधितांनी खालील सूचनांची काटेकोरपणे अंमलबजावणी करावी.

१) विभागीय आयुक्त, छत्रपती संभाजीनगर यांनी भूधारकास अदा करण्यासाठी परिगणना केलेली वाढीव मोबदला रक्कम अंतिम व योग्य असल्याची खातरजमा करुन, उपलब्ध करुन दिलेली उपरोक्त रक्कम भूधारकास तात्काळ अदा करावी.

२) विभागीय आयुक्त, छत्रपती संभाजीनगर यांनी मा.न्यायालयाच्या निर्णयानुसार वाढीव मोबदला मंजूरीचे आदेश तात्काळ निर्गमित करावेत.

३) अदा करण्यासाठी मंजूर केलेल्या बाबी व्यतिरिक्त अन्य बाबींवर अनुदान खर्च होणार नाही यांची विभागीय आयुक्त यांनी दक्षता घ्यावी.

४) या आदेशान्वये मंजूर करण्यात आलेला निधीपेक्षा जास्त निधी कोणत्याही परिस्थितीत खर्च होणार नाही याची संबंधितांनी दक्षता घ्यावी.

५) मा. न्यायालयाचा निर्णयानुसार वाढीव मोबदला अदा करण्यास विलंब होणार नाही यांची संबंधितांनी दक्षता घ्यावी. तसेच न्यायालयीन प्रकरण असूनही, मा.उच्च न्यायालयाच्या निर्णयानंतर एवढ्या विलंबाने निधी मागणी सादर करण्यास जबाबदार असलेल्या संबंधित अधिकारी/ कर्मचारी यांचेवर जबाबदारी निश्चित करण्यात यावी. तसेच मा. न्यायालयाच्या निर्णयानुसार वाढीव मोबदला अदा करण्याबाबतच्या प्रलंबित प्रकरणांचा आढावा घेऊन त्याबाबतचे प्रस्ताव तातडीने शासनास सादर करण्याची दक्षता घ्यावी.

६) सदरच्या आदेशातील नमूद मुख्य लेखाशीर्ष मागणी क्रमांक सी-०९, मुख्य लेखाशीर्ष ४२३५-सामाजिक सुरक्षा व कल्याण यावरील भांडवली खर्च, ०१ पुनर्वसन, २०१ इतर पुनर्वसन योजना, (००) (००) (०१) इतर पुनर्वसन योजना (अनिवार्य) (४२३५ ०१०८) ५०-इतर खर्च (भारित) या लेखाशीर्षांतर्गत कोणताही निधी शिल्लक रहाणार नाही अथवा सदर आदेशान्वये प्राप्त होणारा निधी संबंधित यंत्रणेच्या कोणत्याही Operational Bank Account /PLA (स्वीय प्रपंची खाते) मध्ये जमा करून ठेवण्यात येणार नाही, याची संबंधित अधिकारी यांनी दक्षता घ्यावी.

७) मुख्य लेखाशीर्ष मागणी क्रमांक सी-०९, मुख्य लेखाशीर्ष ४२३५-सामाजिक सुरक्षा व कल्याण यावरील भांडवली खर्च, ०१ पुनर्वसन, २०१ इतर पुनर्वसन योजना, (००) (००) (०१) इतर

पुनर्वसन योजना (अनिवार्य) (४२३५ ०१०८) ५०-इतर खर्च (भारित) या लेखाशीर्षांतर्गत संबंधित संनियत्रण अधिकारी यांनी होणाऱ्या खर्चाचे स्वतंत्र लेखे ठेवून शासनाच्या प्रचलित लेखा पध्दतीनुसार ते महालेखापाल यांना सादर करावेत. तद्नुषंगाने या लेखाशीर्षाखाली होणाऱ्या खर्चाचा ताळमेळ, विनियोजन लेखे इत्यादि कामे संबंधितांनी प्रचलित पध्दतीप्रमाणे करावीत.

८) यासंदर्भातील खर्च विवरणपत्रे/ अहवाल शासनास न चुकता सादर करण्यात यावीत. वरील निधीसंबंधित खर्च ताळमेळाची विवरणपत्रेमहालेखापाल कार्यालयाच्या Reconcillation Slip सह शासनास न चुकता सादर करावीत.

९) संबंधित अधिकारी यांनी या आदेशान्वये वितरीत निधीचे उपयोजन प्रमाणपत्र Utilisation Certificate महालेखापाल कार्यालय, संबंधित जिल्हाधिकारी/ विभागीय आयुक्त/शासनास तातडीने सादर करावे.

३. सदर आदेश वित्त विभाग शासन निर्णय क्र. विअप्र-२०२६/प्र.क्र.२२/विनियम, दि. ११.०८.२०२६ मधील वित्तीय नियमावली भाग-पहिला उपविभाग-तीन परिच्छेद क्र. २७ (२) अन्वये प्रशासकीय विभागास असलेल्या अधिकारांनुसार व वित्त विभागाच्या प्राप्त सहमतीनुसार निर्गमित करण्यात येत आहे.

४. सदर शासन निर्णय महाराष्ट्र शासनाच्या www.maharashtra.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध करण्यात आला असून त्याचा संगणक संकेताक २०२६०८३११२४०३९२४४१ असा आहे. हा शासन निर्णय डिजीटल स्वाक्षरीने साक्षांकित करुन काढण्यात येत आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने,

MADHAV ASHOK BANTEWAD

Digitally signed by MADHAV ASHOK BANTEWAD
DN: c=IN, o=GOVERNMENT OF MAHARASHTRA, ou=REVENUE AND FOREST DEPARTMENT,
2.5.4.20=0d181aa39b4d21e44d471606b7df670cbc65b3cb8d80b1ca27929265161d139a, postalCode=400032, st=Maharashtra,
serialNumber=1B720BC879C4DDAC69D0E7FC911BFC2A93205010890D544AFB10419754DA2525, cn=MADHAV ASHOK BANTEWAD
Date: 2026.08.31 12:41:34 +05'30'

(माधव अ. बंटेवाड)
कार्यासन अधिकारी, महाराष्ट्र शासन

प्रत,

१. विभागीय आयुक्त तथा मुख्य नियंत्रण अधिकारी (पुनर्वसन), छत्रपती संभाजीनगर
२. सह आयुक्त (पुनर्वसन), छत्रपती संभाजीनगर.
३. जिल्हाधिकारी, धाराशिव.
४. उपविभागीय अधिकारी तथा भूसंपादन अधिकारी, उमरगा.
५. महालेखापाल (लेखा व अनुज्ञेयता) महाराष्ट्र राज्य, मुंबई-१, नागपूर-२ (२ प्रतीत)
६. महालेखापाल (लेखा परीक्षा) महाराष्ट्र राज्य, मुंबई-१, नागपूर-२ (२ प्रतीत)
७. जिल्हा कोषागार अधिकारी, धाराशिव.
८. महसूल व वन विभाग,कार्यासन ब-१,मंत्रालय, मुंबई ३२.
९. महसूल व वन विभाग,पी.ए.सी.कार्यासन, मंत्रालय, मुंबई ३२.
१०. निवडनस्ती कार्यासन पुनर्वसन-६, मदत व पुनर्वसन विभाग,मंत्रालय, मुंबई-३२.

* * *